**सातव्या वेतन आयोगानुसार दिनांक १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत सेवानिवृत्त निवृत्तिवेतनधारकांना सुधारित अंशराशीकरणाचा लाभ देण्याबाबत सुधारणा...**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन पूरकपत्र क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १२ जुलै, २०२१

**संदर्भ** : १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : निअंक -१०८६/१७७१/सेवा-४, दि.३०.०५.१९८८.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.०१.०३.२०१९.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४, दि.०५.०२.२०२१ .

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १ जानेवारी २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीमध्ये जे शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत, आणि यापूर्वी सहाव्या वेतन आयोगानुसार मूळ निवृत्तिवेतनावर अंशराशीकरणाचा लाभ घेतलेला आहे, त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणाऱ्या मूळ निवृत्तिवेतनावर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ देय करण्यात आला आहे. संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयात आता खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**पूरक पत्र :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ नुसार निवृत्तिवेतनाचे अशंराशीकरण करणे ही कर्मचाऱ्यांची ऐच्छिक बाब आहे. त्यामुळे दिनांक ०१.०१.२०१६ ते ३१.१२.२०१८ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांना संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयानुसार अनुज्ञेय ठरणारे निवृत्तिवेतनाचे सुधारीत अंशराशीकरण देखील ऐच्छिक राहील. निवृत्तीवेतनधारकांना सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास, निवृत्तिवेतनधारकांनी ते ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले त्या कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखांकडे सोबतच्या नमुन्यात स्वत: लेखी अर्ज करावा.

२. निवृत्तिवेतनधारकांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर कार्यालय प्रमुखानी “निवृत्तिवेतनवाहिनी” या प्रणालीवर याकरिता उपलब्ध करून दिलेल्या सुविधेद्वारे संबंधीत महालेखापाल कार्यालयाकडे सुधारित अंशराशीकरणाचा प्रस्ताव “ऑनलाइन” सादर करावा. याप्रकरणी कोणतेही कागदपत्र/ सेवापुस्तक महालेखापाल कार्यालयाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही याची नोंद कार्यालय प्रमुखांनी घ्यावी. सदर कार्यपध्दतीद्वारे सुधारित अंशराशीकरणाचे प्रस्ताव दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंतच सादर करता येतील.

३. कार्यालय प्रमुखांकडून प्राप्त “ऑनलाइन” प्रस्तावाच्या आधारे महालेखापाल कार्यालयाकडून ई-प्राधिकार पत्र निवृत्तिवेतनाचे प्रथम प्रदान करण्यात आलेल्या कोषागाराच्या नावे निर्गमित होईल. सदर प्राधिकार पत्राच्या आधारे संबंधीत कोषागारांकडून प्रदानाची कार्यवाही करण्यात येईल. दरम्यानच्या कालावधीत एखादे निवृत्तिवेतन प्रकरण अन्य कोषागाराकडे अथवा अन्य महालेखापाल कार्यालयाकडे वर्ग करण्यात आले असल्यास, अशी प्रकरणे -प्रथम प्रदान कोषागाराने॰ सदर निवृत्तिवेतन प्रकरण ज्या कोषागाराकडे वर्ग करण्यात आले आहे, त्या कोषागाराचे नावे नमूद करुन महालेखापाल कार्यालयाकडे ऑनलाईन परत करावीत.

४. संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयान्वये देय असलेला सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ कर्मचाऱ्यास नियमानुसार यापूर्वी असुधारित निवृत्तिवेतनावर प्रदान करण्यात आलेल्या लाभासमवेतच देय होता. ही बाब विचारात घेता आता सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ अनुज्ञेय करण्यासाठी नव्याने वैद्यकीय चाचणी करण्याची आवश्यकता नाही.

५. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ च्या नियम ६ (१) (तीन) (ए) “अन्वये कोषागारामधून निवृत्तिवेतन घेणा-या अर्जदाराच्या बाबतीत, निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य त्याला ज्या तारखेस मिळेल ती तारीख किंवा लेखापरीक्षा अधिका-याने निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य प्रदान करण्यासाठी प्राधिकारपत्र दिल्यानंतर तीन महिन्यांच्या अखेरची तारीख, यापैकी जी तारीख अगोदरची असेल त्या तारखेपासून अंशराशीकरणांमुळे निवृत्तिवेतनाची रक्कम कमी करण्यात येईल” अशी तरतुद आहे. तसेच संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्यात येतो.

६. सद्यस्थितीत ज्या कार्यालयाची प्रकरणे सेवार्थ प्रणाली मधुन ऑनलाईन महालेखापाल कार्यालयास सादर केली आहेत, अशाच निवृत्तीवेतनधारकांना सुधारीत अंशराशीकरण लाभ देण्याबाबची माहिती आहरण व संवितरण अधिकारी यांना, त्यांच्या सेवार्थ लॉगीन मधून उपलब्ध करून देण्यात येत आहे. शिक्षण विभाग व इतर महामंडळे यांची प्रकरणे यापूर्वी ज्या पध्दतीने कार्यालय प्रमुखांकडून महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात आलेली होती, त्याच पध्दतीने सुधारीत अंशराशीकरणाचा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात यावेत.

७. ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषित्तर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये आणि कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तिवेतनधारक यांना वरील पूरकपत्र योग्य त्या फेरफारांसह लागू राहील.

८. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहील.

९. सदर पूरक पत्रातील तरतुदी अखिल भारतीय सेवेतील निवृत्तिवेतनधारक / राजकीय निवृत्तिवेतनधारक / स्वातंत्र्य सैनिक निवृत्तिवेतनधारक / शौर्यपदकभत्ता निवृत्तिवेतनधारक / जखम अथवा इजा निवृत्तिवेतनधारक यांना लागू होणार नाहीत.

१०. ऑनलाईन सुधारीत अंशराशीकरण प्रकरण महालेखापाल कार्यालयास सादर करण्याची सुधारीत कार्यपध्दती "जोडपत्र-अ" मध्ये विषद केली आहे.

सदर शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२१०७१२१६१३५५०६०५ असा आहे. हे पूरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=6015944fe7d58a83f4a54c43147b5da1e34861e2984e9f793b66f7249aaa9c1a, pseudonym=CAD826A943AA15444490C64B66C7EE464C4AD05A, serialNumber=D4994742192306FCC1DEA9AADD3810639506519FA652B919767B98B04E905A18, cn=INDRAJEET SAMBHAJI GORE
Date: 2021.07.12 16:23:05 +05'30'

**( इंद्रजित गोरे )**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२) महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
३) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
४) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
६) सह संचालक, लेखा व कोषागारे, मुबंई.
७) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई,
८) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.
१०) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
११) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
१२) सर्व कोषागार अधिकारी,
१३) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई

१४) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,

१५) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

१६) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,

१७) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,

१८) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,

१९) प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ न्याय शाखा) मुंबई,

२०) प्रबंधक, उच्च न्यायालय ( अपील शाखा ) मुंबई,

२१) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

२२) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

२३) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

२४) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद

२५) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.

२६) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)

२७) सचिव, राज्य निवडणूक आयोग,

२८) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग,

२९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०००३२.

३०) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,

३१) सर्व विभागीय आयुक्त,

३२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

३३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,

३४) संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,

३५) संचालक (तंत्र शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई,

३६) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

३७) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई,

३८) कुल सचिव, सर्व कृषि व कृषितर विद्यापीठे,

३९) वित्त विभागातील सर्व कार्यासने,

४०) निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

शासन पूरकपत्र क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४, दि.१२ जुलै, २०२१ सोबतचे जोडपत्र

**"जोडपत्र – अ"**

(१) सातव्या वेतन आयोगानुसार दि.१.१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीत निवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांच्या सुधारीत मूळ निवृत्तिवेतनावर सुधारीत अंशराशीकरणा लाभ देण्याच्या अनुषंगाने MAHA-IT कडून सेवार्थ प्रणालीत Tab विकसीत (Develop) करण्यात आलेला आहे.

(२) महालेखापाल कार्यालय, मुंबई / नागपूर यांचेकडून दि.१.१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीत निवृत्त झालेल्या ज्या निवृत्तिवेतनधारकांनी यापूर्वी सहाव्या वेतन आयोगानुसार ४०% अंशराशीकरणाचा लाभ घेतला आहे, अशा निवृत्तिवेतनधारकांची माहिती संबंधित आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल.

(३) ज्या निवृत्तिवेतनधारकांना सदर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ घेण्याची इच्छा असेल, त्यांनी शासनाने विहित केलेल्या अर्जात तशी इच्छा व्यक्त करुन तो अर्ज संबंधित कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडे देण्यात यावा.

(४) आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांच्याकडे ज्या निवृत्तिवेतनधारकांस सदर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ मिळण्यासाठी अर्ज सादर केला आहे, अशा निवृत्तिवेतनधारकांचे प्रकरण आहरण व संवितरण अधिकारी, ऑनलाईन महालेखपाल कार्यालय, मुंबई / नागपूर यांना सादर करतील.

(५) महालेखापाल कार्यालय, सुधारीत अंशराशीकरणाचे प्राधिकारपत्र डिजीटल स्वाक्षरीद्वारे (Digital Signature) तयार करुन ते ऑनलाईन निवृत्तिवेतन आज्ञावली मार्फत संबंधित कोषागार कार्यालयास पाठविण्याबाबतची कार्यवाही करतील. आहरण व संवितरण अधिकारी यांनाही ऑनलाईन प्रत देण्यात येईल.

(६) महालेखापाल कार्यालयाकडून अंतिम "सुधारीत अंशराशीकरणाचे प्राधिकारपत्र" निर्गमित करण्यात येईल. महालेखापाल कार्यालयाकडून "सुधारीत अंशराशीकरणाचे प्राधिकारपत्र" ऑनलाईन निवृत्तिवेतन आज्ञावलीमध्ये कोषागार कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर कोषागार कार्यालयाद्वारे पुरवणी देयक (Supplementary Bill) तयार करुन त्याचे प्रदान थेट निवृत्तिवेतनधारक यांच्या खात्यात जमा करण्यात येईल.

## निवृत्तीवेतनाच्या ४०% भागाच्या सुधारीत अंशराशीकरणासाठी
## अर्जाचा नमुना

.............................................................. सेवा निवृत्तीच्या कार्यालयाचे नाव व
..............................................................संपूर्ण पत्ता )
..............................................................यांस,

**<u>विषय :- निवृत्तिवेतनाचे सुधारीत अंशराशीकरण :- मिळण्याबाबत विनंती अर्ज</u>**

**संदर्भ :- महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.सेनिवे -२०१९/प्र.क्र.३४८/ सेवा-४, दिनांक ०५.०२.२०२१**

महोदय,

महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण ) नियम ,१९८४ मधील तरतुदींनुसार खाली दर्शविण्यात आल्याप्रमाणे , मला माझ्या निवृत्तिवेतनाच्या भागाचे सुधारीत अंशराशीकरण करावयाचे आहे. आवश्यक तपशील खाली दिला आहे.

१. संपूर्ण नावः-
२. सेवानिवृत्तीच्या वेळी असलेले पदनामः-
३. सेवानिवृत्तीची तारीख .:-
४. प्राधिकृत करण्यात आलेली मूळ निवृत्तीवेतनाची रक्कम .:-
५. निवृत्तीवेतन प्रदान आदेश (P.P.O. NUMBER) क्रमांक व दिनांकः-
(निवृत्तीवेतनधारकाने किंवा आहरण व संवितरण अधिका-याने नमूद करावे)
६. निवृत्तीवेतन प्रदान करणा-या कोषागाराचे नाव व संपूर्ण पत्ताः-
७. निवृत्तीवेतनधारक ज्या बँकेतून निवृत्तीवेतन घेत आहे, त्या बॅकेचे नाव/शाखेचे नावः-
८. निवृत्तीवेतन धारकाचा बँक खाते क्रमांकः-
९. निवृत्तीवेतनधारक यांचा मोबाईल नंबर
१०. निवृत्तीवेतनधारक यांचा ई- मेल पत्ता

ठिकाण :

दिनांक :

निवृत्तीवेतनधारकाची सही :
निवासी पत्ता .............................................
.............................................
.............................................
मोबाईल क्रमांक ..........................................